<u>नि. फौ. ख. क्र.१६६/२०१७</u> निशाणी ६२

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.५ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – गुणवंत महावीर हरणे

वय – ६६ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त, सहा. पोलीस उपनिरीक्षक

पत्ता – रा. गिता नगर, अकोला, ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त. अ. सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी बाळापूर पो.स्टे. येथे २०१७ साली ए.एस.आ. म्हणून कार्यरत होतो. दि.२७.०५.२०१७ रोजी मी कर्तव्यावर हजर असताना वाडेगाव पोलीस चौकीवरुन हे.कॉ. गोवर्धन यांनी पोलीस चौकीमध्ये गुन्ह्याबाबत घटनेचा प्राथमिक अहवाल दाखल केला. त्यामध्ये खबरी नामे अनंता वाडकर यांचा जबाब तसेच डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र आणून पो.स्टे. येथे दाखल केले. सदर कागदपत्रांवरुन मी आरोपी नामे गणेश वाडकर व इतर ३ यांच्याविरुध्द अपराध क्र.२०५/२०१७, भादंवि कलम ३२४, ३२३, ५०४ सह ३४ अन्वये गुन्हा दाखल केला. आता मला छापील FIR दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६३** देण्यात येत आहे. सदर गुन्ह्याचा तपास हा वाडेगाव पोलीस चौकीचे हे.कॉ. बेदरकर यांच्या कडे पोलीस ठाणेदार यांच्या आदेशाने वर्ग करण्यात आला. तपासिक अधिकारी श्री. बेदरकर हे मयत असल्याबाबतची माहिती मला आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती एच. बी. टिकार यांचे मार्फत उलटतपासः</u>**

२. सदर गुन्हा दाखल करतेवेळी मी फिर्यादी अथवा श्री. गोवर्धन यांच्याकडे कोणत्याही कागदपत्रांची मागणी केली नाही. सदर प्रकरणामध्ये मी केवळ गुन्हा दाखल केलेला आहे, त्याव्यतिरीक्त काहीही केलेले नाही. गुन्हा दाखल करतेवेळी मी मला प्राप्त झालेल्या कोणत्याही कागदपत्रांची शहानिशा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन आरोपीविरुध्द खोटा रिपोर्ट दाखल करुन घेतला.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २७.०२.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.02.27 15:55:24 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २७.०२.२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २७.०२.२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २७.०२.२०२६ |